# जिल्हा निवड समिती, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

## जाहिरात क्रमांक ०१, दिनांक ११/०४/२०१३

************************************************************

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ व मा.उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट मुंबई यांचेकडील पत्र क्र.एपिटी-२०१२/प्र.क्र.३२०/आस्था-८, दिनांक १९ मार्च, २०१३ अन्वये रायगड जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड मधील खालील **परिशिष्ट-अ** मध्ये नमुद केलेल्या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून विहित नमुन्यात **दिनांक २६/०४/२०१३ पर्यंत** अर्ज मागविण्यांत येत आहेत.

## परिशिष्ट-अ

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतन संरचना | | पदसंख्या | पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, इतर अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | | वेतन बँड | ग्रेड वेतन | | |
| १ | पद क्रमांक- १<br>कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ९३००-३४८०० | ४३०० | अनुसूचित जमाती- २ (महिला -१, सर्वसाधारण -१)<br>वि.जा.(अ)-१ (सर्वसाधारण-१)<br>एकुण -०३ | **स्थापत्य अभियांत्रिकी विषयातील मान्यता प्राप्त पदवी किंवा पदविका** (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करणें आवश्यक आहे. |
| २ | पद क्रमांक -२<br>विस्तार अधिकारी (कृषि) | ९३००-३४८०० | ४२०० | भ.ज.(क)-०१ (सर्वसाधारण- १)<br>इमाव -०२ (महिला- १, सर्वसाधारण- १)<br>खुला -०४ (महिला- १, माजी सैनिक - १, सर्वसाधारण- २)<br>अपंग-१ (अंध-लो व्हीजन/ अंशत: कर्णबधीर/ अस्थीव्यंग-LLA - १ )<br>एकुण -०८ | मान्यता प्राप्त विद्यापिठाची **कृषि विषयातील पदवी** किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण करीत असलेला उमेदवार तसेच ज्यांनी कृषि विषयात उच्च शैक्षणिक अर्हता आणि कृषि विषयक कामाचा अनुभव प्राप्त केला असेल किंवा सुधारीत कृषि ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असेल अशा उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| ३ | पद क्रमांक -३<br>प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ९३००-३४८०० | ४२०० | खुला -०१ (सर्वसाधारण-१)<br>एकुण-०१ | **मान्यता प्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र घेवून विज्ञान विषयाची पदवी** असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. (परंतू हाफकिन संस्थेच्या वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रशास्त्रामध्ये पदविका धारण करणा-या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल) |
| ४ | पद क्रमांक- ४<br>पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) | ९३००-३४८०० | ४१०० | अनुसूचित जमाती - १ (सर्वसाधारण-१)<br>इ.मा.व - १ (सर्वसाधारण-१)<br>खुला -१ (सर्वसाधारण-१)<br>एकुण -०३ | **मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी** आणि बाल सेविका किंवा अंगणवाडी सेविका म्हणून खालील पैकी अनुदान स्त्रोत असणाऱ्या केंद्रामध्ये कार्यरत असावी. १)केंद्र किंवा राज्य शासन २)केंद्रीय समाज कल्याण बोर्ड किंवा राज्य समाज कल्याण बोर्ड ३)रेडक्रॉस ४)बालवाडी पोषण कार्यक्रमांतर्गत मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून अनुदान मिळणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील पुढील पाच स्वयंसेवी संस्थापैकी एक, केंद्रीय समाज कल्याण बोर्ड, इंडियन कौन्सिल फॉर चाईल्ड वेलफेयर, हरिजन सेवक संघ, भारतीय आदिमजाती सेवक संघ, कस्तूरबा गांधी नॅशनल मेमोरिअल ट्रस्ट **किंवा** उमेदवाराने प्राधान्याने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण (न्यूट्रीशन) किंवा सोशिओलॉजी या विषयात मान्यता प्राप्त विद्यापीठात पदवीधर असावे **किंवा** मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षक किंवा मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असावे. |
| ५ | **पद क्रमांक- ५**<br>**विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-२** | ९३००-३४८०० | ४४०० | अनुसुचित जमाती -१<br>(सर्वसाधारण-१ )<br>**एकूण -०१** | **मान्यताप्राप्त विद्यापीठाचे स्नातक** असतील आणि<br>(अ) बी.एड.पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) घेतल्यानंतरच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांतील अगर कनिष्ठ महाविद्यालयातील कमीत-कमी तीन वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल **किंवा**<br>(ब) बी.एड.पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत-कमी तीन वर्षाचा अनुभव असेल **किंवा**<br>(क) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्यानंतरच्या पाच वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. |
| ६ | **पद क्रमांक- ६**<br>**औषध निर्माता** | ५२००-२०२०० | २८०० | अनुसूचीत जाती -१<br>(सर्वसाधारण-१)<br>अनु.जमाती -२<br>(महिला-१, सर्वसाधारण-१)<br>खुला - १<br>(सर्वसाधारण-१)<br>अपंग - २<br>(अस्थिव्यंग-१,कर्णबधिर/मुकबधिर-१ )<br>**एकुण -०६** | औषध शाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असतील. **किंवा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण** झालेले असतील आणि रुग्णालयात **किंवा** दवाखान्यात औषध मिश्रणाच्या कामावर असलेले **किंवा** जेथे वैद्यक व्यवसायीच्या औषध पत्रानुसार नियमितपणे औषधे दिली जातात अशा ठिकाणी ज्यांना सात वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असेल **किंवा** माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि राज्य सरकारच्या रुग्णालयातील **दवाखाना सहाय्यकाच्या पदाचा ५ वर्षाचा अनुभव** असेल. |
| ७ | **पद क्रमांक- ७**<br>**वरिष्ठ सहाय्यक (लेखा)** | ५२००-२०२०० | २४०० | अनुसूचित जमाती- १<br>(सर्वसाधारण-१)<br>**एकूण -०१** | **मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी** धारण करीत असतील आणि याबाबतीत लेखाशास्त्र व लेखापरिक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्यांना अथवा पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गातील वाणिज्य शाखेची पदवी धारण करणाऱ्या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधीपर्यंत लेखा विषयक कामाचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल. |
| ८ | **पद क्रमांक- ८**<br>**आरोग्य सेवक (महिला) (ए.एन.एम.)** | ५२००-२०२०० | २४०० | अनुसुचित जमाती -१<br>(सर्वसाधारण-१)<br>वि.जा.(अ)- १<br>(सर्वसाधारण-१)<br>खुला-५<br>(माजी सैनिक-१, अंशकालीन कर्मचारी-१, सर्वसाधारण-३) | **माध्यमिक शांलात प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण** व ज्यांची अर्हता प्राप्त सहाय्यकारी प्रसविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील असे उमेदवार. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अपंग- १० <br> (अस्थिव्यंग-४ कर्णबधिर /मुकबधिर-३,अल्पदृष्टी-३) <br> **एकूण - १७** | |
| ९ | **पद क्रमांक- ९** <br> **कंत्राटी ग्रामसेवक** | ६०००/- एकत्रित मानधन | -- | **अनुसुचित जाती -१** (महिला-१) <br> **भ.ज.(ड)- १** (सर्वसाधारण-१) <br> **इ.मा.व.- ४** (माजी सैनिक-१, अंशकालीन कर्मचारी-१, सर्वसाधारण-२) <br> **खुला-७** (माजी सैनिक-१, महिला-१, अंशकालीन कर्मचारी-१, सर्वसाधारण-४) <br> **अपंग- १** (अल्पदृष्टी-१) <br> **एकूण - १४** | नियुक्ती ही पुढील कोणत्याही एका प्रकारे करण्यांत येईल - <br> (एक) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता आणि कृषि विषयाची पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम धारण करीत असतील. मात्र कृषि विषयाची पदविका किंवा उच्च अर्हता धारण करणा-या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यांत येईल. <br> किंवा <br> (दोन) उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण; किंवा <br> शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा <br> अभ्यासक्रम) ; किंवा <br> शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यू.) <br> **आणि ;** <br> **संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.** <br> **टिप :-** कंत्राटी ग्रामसेवक नियुक्तीचा कालावधी:- शासनाचे ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एपिटी-२००५/प्र.क्र. २२९/आस्था-८ दिनांक २० एप्रिल २००६ अन्वये कंत्राटी ग्रामसेवकाची प्रथम नियुक्ती ३ वर्षाचे कालावधीसाठी राहील. कंत्राटी ग्रामसेवकांनी तीन वर्षाची सेवा समाधानकारक रित्या पूर्ण केल्यानंतर लेखी परिक्षा न घेता (सेवेत आल्यानंतर प्रत्येक कर्मचा-यांसाठी सेवा प्रवेशोत्तर परिक्षा सक्तीची असल्याने), मंजूर पदांच्या उपलब्धतेनुसार सेवा नियमित केली जाईल. <br> कंत्राटी ग्रामसेवकांनी नियुक्ती ठिकाणी हजर होण्यापूर्वी सुरक्षा ठेव आणि जामीन पत्र:- ग्रामसेवकाकडे आर्थिक जबाबदारी असल्यामुळे नेमणूक देण्यापूर्वी त्या उमेदवारांकडून रुपये १०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार मात्र) इतकी सुरक्षा ठेव घेण्यांत येईल व दोन जामीनदार घेण्यांत येतील. |
| १० | **पद क्रमाक -१०** <br> **आरोग्य पर्यवेक्षक** | ९३००-३४८०० | ४२०० | **अनुसूचित जमाती-१** (सर्वसाधारण-१) <br> **एकूण- ०१** | (एक) शास्त्र शाखेतील संविधानिक विद्यापीठाची पदवी धारण केलेली असेल **आणि** <br> (दोन) बहुउद्देशीय आरोग्य सेवकांसाठीचा १२ महिन्याचा पाठयक्रम यशस्वीरित्या पुर्ण केलेले उमेदवार. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | **पद क्रमांक -११**<br>विस्तार अधिकारी पंचायत आणि समाजकल्याण (कार्यकारी आणि ग्राम विस्तार )<br>व्दितीय श्रेणी | ९३०० - ३४८०० | ४२०० | अनुसूचित जाती-१<br>(सर्वसाधारण-१)<br>**एकूण- ०१** | मान्यता प्राप्त **विद्यापीठाची पदवी** धारण करीत असतील असे उमेदवार. परंतु ग्रामीण समाजकल्याण व स्थानिक विकास कार्यक्रमाचा तीन वर्षाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| १२ | **पद क्रमांक -१२**<br>वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | ५२००- २०२०० | २४०० | इ.मा.व.-१<br>(सर्वसाधारण-१)<br>**एकूण- ०१** | **मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी** धारण करीत असतील असे उमेदवार. |
| १३ | **पद क्रमांक- १३**<br>पशुधन पर्यवेक्षक | ५२००- २०२०० | २४०० | अनुसूचित जमाती- १<br>(सर्वसाधारण-१)<br>वि.जा.(अ) - १<br>(सर्वसाधारण-१)<br>खुला - १<br>(सर्वसाधारण-१)<br>**एकूण -०३** | **माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संचालकांडून किंवा कोणत्याही वैधानिक कृषि विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण पाठयक्रमात उत्तीर्ण** झाले असतील **किंवा** तांत्रिक परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून घेण्यात येणाऱ्या दुग्धशाळा क्षेत्र व्यवस्थापनातील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील **किंवा** वैधानिक विद्यापीठामधील पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील **किंवा** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपुर यांच्या मार्फत चालविण्यांत येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार. |
| १४ | **पद क्रमांक- १४**<br>कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | ५२००- २०२०० | १९०० | अनुसुचीत जमाती -५<br>(माजी सैनिक-१, महिला-२, सर्वसाधारण-२ )<br>भ.ज.(क)-१<br>(सर्वसाधारण-१)<br>इ.मा.व.-१<br>(सर्वसाधारण-१)<br>खुला-४<br>(महिला-१, माजी सैनिक-१, सर्वसाधारण-२)<br>**एकूण - ११** | **(एक) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण आणि**<br>**(दोन)**महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे **मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र** धारण करीत असतील **किंवा** टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील.<br>**(तीन)** परंतु असे की, उक्त दोन भाषांपैकी कोणत्याही एका भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेले उमेदवार, नियुक्ती केलेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत दुसऱ्या भाषेतील दर मिनिटास ३० शब्दापेक्षा कमी नाही अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र मिळवतील असे वेगाचे प्रमाणपत्र प्राप्त न केल्यास, राज्य शासन त्या बाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून ठरवतील अशा कारवाईस ते पात्र ठरतील. परंतु आणखी असे की इंग्रजी विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमदेवारांना अधिक पसंती दिली जाईल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | **पद क्रमांक- १५**<br>कनिष्ठ सहाय्यक<br>(लेखा) | ५२००-२०२०० | १९०० | अनुसुचित जाती -१<br>(सर्वसाधारण-१)<br>अनुसूचीत जमाती -२<br>(महिला-१, सर्वसाधारण-१)<br>वि.मा.प्र- १<br>(सर्वसाधारण-१)<br>इ.मा.व.- १<br>(सर्वसाधारण-१)<br>खुला-३<br>(महिला-१, सर्वसाधारण-२)<br>**एकूण - ०८** | (एक) **माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तिच्याशी सममुल्य परीक्षा जे उत्तीर्ण** झालेले असतील असे उमेदवार आणि<br>(दोन)महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेणेसाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी **मराठी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र** धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील असे उमेदवार.<br>परंतु असे की, इंग्रजी विषय घेवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल.<br>कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यासाठी लेखा विषयक कामकाजाचा पुर्वानुभव असलेल्या उमेदवारास अधिक पंसती राहील. |
| १६ | **पद क्रमांक- १६**<br>विस्तार अधिकारी<br>(सांख्यिकी) | ९३००-३४८०० | ४२०० | अनुसुचित जाती -१<br>(सर्वसाधारण-१)<br>खुला-१<br>(सर्वसाधारण-१)<br>**एकूण- ०२** | मान्यताप्राप्त **विदयापिठाची विज्ञान, कृषि, वाणिज्य किंवा वाङमय शाखेची अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी विषयासह प्रथम अगर व्दितीय वर्गातील पदवी** धारण करीत असतील **किंवा** ज्यांना नमुना सर्वेक्षण करण्याचा अनुभव असेल, **किंवा** पदवी व अनुभव दोन्ही असतील असे उमेदवार.<br>(परंतु उक्त विषयापैकी एका विषयाची स्नातकोत्तर पदवी धारण करणा-या उमेदवारांना अधिक पसंती देण्यांत येईल.)<br>नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या उमेदवारांने अर्थ व साख्यिकी संचालनालय, मुंबई यांचेकडुन वरिष्ठ सहाय्यक (सांख्यिकी) या पदासाठी चालविण्यात येणारा प्रशिक्षण पाठयक्रम सततच्या पाच संधी मध्ये यशस्विपणे पुर्ण करणे आवश्यक असेल. प्रशिक्षण पाठयक्रम विहित मुदतीत पुर्ण न केल्यास त्यांना सेवेतुन मुक्त करण्यांत येईल. |
| १७ | **पद क्रमांक- १७**<br>लघुलेखक<br>(निम्न श्रेणी) | ९३००-३४८०० | ४२०० | खुला - १<br>(सर्वसाधारण-१)<br>**एकूण- ०१** | (एक) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक व शिक्षण मंडळे अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) या अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने शिक्षणाच्या माध्यमिक टप्प्याच्या अखेरीस घेतलेली **माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा त्या परीक्षेस तुल्य असलेली परीक्षा उत्तीर्ण झाले असतील** आणि<br>(दोन)आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेले किंवा त्या नियमांच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देशपूर्वक मान्यता देण्यात आलेल्या अशा इतर संस्थेने दिलेले **इंग्रजी किंवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटाला** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | **१०० शब्दांहून कमी नसेल इतक्या गतीचे आणि इंग्रजी टंकलेखनातील दर मिनिटाला ४० शब्दांहून किंवा मराठी टंकलेखनातील दर मिनिटाला ३० शब्दांहून कमी नसेल इतक्या गतीचे प्रमाणपत्र** धारण करणारे उमेदवार. |
| १८ | **पद क्रमांक- १८**<br>**शिपाई /परिचर** | ४४००-<br>७४४० | १३०० | **अनुसुचित जाती -२**<br>(महिला-१, सर्वसाधारण-१)<br>**भ.ज.(ड)-१**<br>(सर्वसाधारण-१)<br>**खुला-७**<br>(महिला-२, माजी सैनिक-१ अंशकालीन कर्मचारी-१, सर्वसाधारण-३)<br>**एकूण= १०** | **मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेची कमीत-कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण** असलेले उमेदवार. |
| १९ | **पद क्रमांक -१९**<br>**स्त्री -परिचर** | ४४००-<br>७४४० | १३०० | **खुला - १**<br>(सर्वसाधारण-१)<br>**अपंग-१**<br>(अस्थिव्यंग-१)<br>**एकूण -०२** | **मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेची कमीत-कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण** असलेले उमेदवार. |

**उक्त "परिशिष्ट-अ" मध्ये नमुद पदांमध्ये / पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट होऊ शकते, तसेच रिक्त पदांच्या सामाजिक / समांतर आरक्षणांमध्ये बदल होऊ शकतो याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समिती, रायगड यांचेकडे राहतील.**

**१. टिप :-**

**१.१ शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एपीटी-२००६/प्र.क्र. ९४/आस्था-८, दि.०८.०६.२००६ अन्वये जिल्हा परिषदेतील पद क्रमांक १८ व १९ वरील शिपाई/ स्त्री परिचर या पदाकरिता गठीत केलेल्या समितीचे अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे असतील.**

**१.२ अर्ज करण्याचा कालावधी दि. १२/०४/२०१३ पासुन दि. २६/०४/२०१३ रोजी सांयकाळी ०५.४५ वाजे पर्यंत राहील.(अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख २६/०४/२०१३) तसेच प्रवेशपत्र लेखी परिक्षेच्या दिनांकापुर्वी आठ दिवस आगोदर पोष्टाने वितरीत केले जातील.**

१.३ लेखी परिक्षेसाठी पात्र /अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (www.zpraigad.gov.in) वर प्रसिद्ध केली जाईल. अर्जाच्या छानणीमध्ये अपात्र ठरलेल्या अर्जदाराने सबळ पुरावा दिल्यास त्यांच्या पात्रते बाबत फेर विचार होऊ शकेल

१.४ खालील "परिशिष्ट - ब "मधील रकाना क्रमांक ०३ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापुर्वी प्रवेशपत्र आठ दिवस आगोदर पोष्टाने वितरीत केले जातील. पात्र उमेदवारांना त्यांचे **प्रवेशपत्र** पोष्टाव्दारे प्राप्त **न झाल्यास**, त्यांनी प्रवेशपत्र संबंधित कार्यालयात लेखी परीक्षेपूर्वी २ दिवस अगोदर पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वत: उपस्थित राहून घ्यावयाची आहेत. प्रवेशपत्र घेताना उमेदवारांनी त्यांचे अर्जावर चिकटविलेल्या फोटोसारखेच दोन पासपोर्ट आकाराचे फोटो व स्वत:ची ओळख सिध्द करणारा छायांकीत पुरावा सोबत आणावा.

१.५ शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरतीप्रक्रियेला लागू राहतील. भरती प्रक्रियेच्या वेळेस शासनाकडील शासन निर्णय, परिपत्रक, आदेश, सेवाप्रवेश नियम इत्यादीमध्ये बदल झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याबदलानुसार भरती प्रक्रिया करण्याचे आधिकार जिल्हा निवड समितीस राहतील. याबाबत कोणताही वाद/न्यायालयीन प्रकरण उपस्थित करता येणार नाही.

१.६ अपंगाच्या एक किंवा दोन रिक्त जागा असलेल्या ठिकाणी अंध /अल्पदृष्टी , मुकबधीर /कर्णबधीर, अस्थीव्यंग या अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवार अर्ज करु शकतील. उमदेवार प्रत्येक संवर्गासाठी उपलब्धतेनुसार व गुणवत्तेनुसार निवडीस पात्र राहील.

१.७ अर्जदाराने स्वहस्ताक्षरात अर्ज भरावा व त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी व अर्जावर भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करावा

२. परिशिष्ट-ब :- परिक्षेचे वेळापत्रक.

| अ. क्र. | पदाचे नांव | लेखी परिक्षेची वेळ व दिनांक | लेखी परिक्षा व तोंडी मुलाखीतीचे गुण संख्या | | अर्ज व डी.डी. ज्या नावे करावयाचा आहे ते पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| | | | लेखी परीक्षेचे गुण | मुलाखतीचे गुण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | दि.०५.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | १८० | २० | कार्यकारी अभियंता (बांधकाम), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| २ | विस्तार अधिकारी (कृषि) | दि.०५.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | १८० | २० | कृषि विकास अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| ३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | दि.५.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | १८० | २० | जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| ४ | पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) | दि.०५.०५.२०१३ दुपारी ०२.०० ते ०३.३० | २०० | २५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी(बा.क.) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| ५ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी -२ | दि.०५.०५.२०१३ दुपारी ०२.०० ते ०३.३० | १८० | २० | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| ६ | औषध निर्माता/मिश्रक | दि.११.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | १८० | २० | जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| ७ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | दि.११.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | १८० | २० | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| ८ | आरोग्य सेवक (महिला) (ए.एन.एम.) | दि.११.०५.२०१३ दुपारी ०२.०० ते ०३.३० | १८० | २० | जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| ९ | कंत्राटी ग्रामसेवक | दि.१२.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | १८० | २० | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| १० | आरोग्य पर्यवेक्षक | दि.१२.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | १८० | २० | जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| ११ | विस्तार अधिकारी (पंचायत) | दि.१२.०५.२०१३ दुपारी ०२.०० ते ०३.३० | २०० | २५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| १२ | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | दि.१९.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | २०० | ० | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| १३ | पशुधन पर्यवेक्षक | दि.१९.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | १८० | २० | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| १४ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | दि.१९.०५.२०१३ दुपारी ०२.०० ते ०३.३० | २०० | ० | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |

| अ. क्र. | पदाचे नांव | लेखी परिक्षेची वेळ व दिनांक | लेखी परिक्षा व तोंडी मुलाखीतीचे गुण संख्या | | अर्ज व डी.डी. ज्या नावे करावयाचा आहे ते पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| | | | लेखी परीक्षेचे गुण | मुलाखतीचे गुण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १५ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | दि.१९.०५.२०१३ दुपारी ०२.०० ते ०३.३० | २०० | ० | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| १६ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | दि.२५.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | २०० | २५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| १७ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | दि.२५.०५.२०१३ सकाळी १०.०० ते ११.३० | २०० | २५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| १८ | शिपाई /परिचर | दि.२५.०५.२०१३ दुपारी ०२.०० ते ०३.३० | ७५ | २५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |
| १९ | स्त्री परिचर | दि.२५.०५.२०१३ दुपारी ०२.०० ते ०३.३० | ७५ | २५ | जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग |

### ३. परिशिष्ट-क :- प्रश्नपत्रिकेचे स्वरुप

| अ. क्र. | पदाचे नांव | मराठी संबंधित गुण | इंग्रजी संबंधित गुण | सामान्य ज्ञान संबंधित गुण | गणित संबंधित गुण | बुध्दी-मापन संबंधित गुण | तांत्रिक प्रश्न संबंधित गुण | एकूण | मुलाखती-साठी ठेवलेले गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | २५ | २५ | २५ | ० | २५ | ८० | १८० | २० |
| २ | विस्तार अधिकारी (कृषि) | २५ | २५ | २५ | ० | २५ | ८० | १८० | २० |
| ३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | २५ | २५ | २५ | २५ | ० | ८० | १८० | २० |
| ४ | पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) | ५० | ५० | ५० | ० | ५० | ० | २०० | २५ |
| ५ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी -२ | २५ | २५ | २५ | ० | २५ | ८० | १८० | २० |
| ६ | औषध निर्माता/मिश्रक | २५ | २५ | २५ | २५ | ० | ८० | १८० | २० |
| ७ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | २५ | २५ | २५ | ० | २५ | ८० | १८० | २० |
| ८ | आरोग्य सेवक (महिला) | २५ | २५ | २५ | २५ | ० | ८० | १८० | २० |
| ९ | कंत्राटी ग्रामसेवक | २५ | २५ | २५ | २५ | ० | ८० | १८० | २० |
| १० | आरोग्य पर्यवेक्षक | २५ | २५ | २५ | २५ | ० | ८० | १८० | २० |
| ११ | विस्तार अधिकारी (पंचायत) | ५० | ५० | ५० | ० | ५० | ० | २०० | २५ |
| १२ | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | ५० | ५० | ५० | ० | ५० | ० | २०० | ० |
| १३ | पशुधन पर्यवेक्षक | २५ | २५ | २५ | ० | २५ | ८० | १८० | २० |
| १४ | कनिष्ठ सहाय्यक लिपीक) | ५० | ५० | ५० | ५० | ० | ० | २०० | ० |

| अ. क्र. | पदाचे नांव | मराठी संबंधित गुण | इंग्रजी संबंधित गुण | सामान्य ज्ञान संबंधित गुण | गणित संबंधित गुण | बुध्दी-मापन संबंधित गुण | तांत्रिक प्रश्न संबंधित गुण | एकूण | मुलाखती-साठी ठेवलेले गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १५ | **कनिष्ठ सहाय्यक (लेखा)** | ५० | ५० | ५० | ५० | ० | ० | २०० | ० |
| १६ | **विस्तार अधिकारी (सांख्यिकी)** | ५० | ५० | ५० | ० | ५० | ० | २०० | २५ |
| १७ | **लघुलेखक (निम्नश्रेणी)** | ५० | ५० | ५० | ० | ५० | ० | २०० | २५ |
| १८ | **शिपाई /परिचर** | २५ | ० | २५ | २५ | ० | ० | ७५ | २५ |
| १९ | **स्त्री परिचर** | २५ | ० | २५ | २५ | ० | ० | ७५ | २५ |

**४. पात्रतेच्या अटी :-**

४.१ **वयोमर्यादा :-**

**४.१.१.** दिनांक २६ /०४/२०१३ रोजी अर्जदाराची किमान वयोमर्यादा १८ वर्ष व कमाल वयोमर्यादा ३३ वर्ष राहील. मागासवर्गीयांसाठी उच्चतम वयोमर्यादा ५ वर्षाने शिथीलक्षम राहील. [आधीपासून जिल्हा परिषद सेवेत असलेल्या उमेदवाराचे वय अर्ज पाठविण्याच्या शेवटच्या तारखेस ४५ वर्षाचे आत असणे आवश्यक आहे.] आरोग्य सेवक महिला (ANM) या पदाकरीता वयोमर्यादा ४० वर्षापर्यंत राहील.

**४.१.२.** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेले आणि महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्या अनुसुचित जाती, अनुसूचित जातीमधील बौध्द धर्मांतरित, अनुसूचीत जमाती, वि.जा.अ, भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र., आणि इमाव उमेदवारांच्या बाबतीत **उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथील केली जाईल.**

**४.१.३.** माजी सैनिकांसाठी वर्ग-३ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्ष इतकी राहील व संबंधित उमेदवाराने **डिसचार्ज कार्डची** सांक्षांकीत प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

**४.१.४.** अपंग व्यक्तींसाठी, प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी वयोमर्यादेची अट **४५** वर्षापर्यंत शिथील राहील.

**४.१.५.** सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य योजने अंतर्गत सलग तीन वर्ष काम केलेल्या अंशकालीन कर्मचा-यांची वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

**४.१.६.** खालील परिच्छेद ६.६ मध्ये नमुद केलेल्या खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षांपर्यंत वयाची अट शिथील करण्यांत येईल.

४.२ **अतिरिक्त शैक्षणिक अर्हता :-**

**४.२.१.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९/०३/२००३ अन्वये अनुक्रमांक १८ व १९ कडील पद वगळून उक्त पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी **संगणक** हाताळणी / वापराबाबतचे खाली नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यांत येईल.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तरापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा.

ब) महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, यांचेकडील अधिकृत MS-CIT अथवा GECT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

४.३ **अन्य अर्हता :-** (दिनांक २६ /०४/२०१३ पर्यंत पुर्ण केली असली पाहिजे.)

**४.३.१.** मागासवर्गीय उमेदवार ज्या प्रवर्गातून अर्ज करीत असेल त्या प्रवर्गाचे सक्षम प्रधिकाऱ्याने दिलेले **जाती/ जमातीचे** प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**४.३.२.** महाराष्ट्र नागरी सेवा **(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र)** नियम २००५ अन्वये शासनाने गट-अ, ब, क व ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणें बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवारांचा अर्ज अपात्र करण्यात येईल. अविवाहित उमेदवारांनी सुध्दा प्रतिज्ञापत्रात अविवाहित असल्याचे नमुद करुन प्रतिज्ञापत्रामधील आवश्यक तो (लागू असलेला) मजकूर भरुन अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

५ **अर्जासोबत शुल्क (फी) :-**

५.१ मागासवर्गीय उमेदवारांनी रु. १००/- (रक्कम रु. शंभर मात्र) रकमेचा, **परिशिष्ट-ब** मधील रकाना ६ नुसार अर्ज ज्यांच्या नावे करावयाचा आहे त्यांच्या नांवे Payable at Alibag असलेल्या कोणत्याही **राष्ट्रीयकृत बँकेचा रेखांकित केलेला डीमांड ड्राफ्ट (डी.डी.)** जोडणे आवश्यक आहे. सदर सेवा शुल्क नापरतावा राहील. कोणत्याही कारणास्तव रक्कम परत केली जाणार नाही.

५.२ वरिष्ठ सहाय्यक (लिपीक), कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) पदासाठी अर्ज करणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांनी रु. ७५/- (रक्कम रु. पंच्चाहत्तर मात्र) व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी **रु. १५०/-** (रक्कम रु. एकशे पन्नास मात्र) रकमेचा डी.डी. जोडणे आवश्यक आहे.

**५.३ वरिष्ठ सहाय्यक (लिपीक), कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) ही पदे वगळून उर्वरित पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने खालीलप्रमाणे आवेदन शुल्क भरण्याचे आहे.**

**i)** खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. २००/- (रक्कम रु. दोनशे मात्र) व मागासवर्गीय उमेदवारांनी **रु. १००/-** (रक्कम रु. शंभर मात्र) रकमेचा डी.डी. **परिशिष्ट-ब** मधील रकाना **६** नुसार अर्ज ज्यांच्या नावे करावयाचा आहे त्यांच्या नांवे Payable at Alibag असलेल्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा रेखांकित केलेला डी.डी. जोडणे आवश्यक आहे. सदर सेवा शुल्क नापरतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

**ii)** मागासवर्गीय उमेदवार जर खुल्या प्रवर्गातून अर्ज करीत असेल तर त्यांना **रु. २००/-** (रक्कम रु. दोनशे मात्र) रकमेचा डी.डी. जोडणें आवश्यक आहे.

५.४ माजी सैनिक आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांना आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

५.५ आवश्यक असलेले परिक्षा शुल्क अर्जा सोबत विहित पध्दतीने (मार्गाने) जोडलेले नसल्यास अर्ज फेटाळण्यांत येईल.

६. <u>अर्जदाराने खालील कागदपत्रांच्या, राजपत्रीत अधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या प्रती अर्जासोबत जोडाव्यात.</u>

**६.१.** परिशिष्ट-अ मध्ये नमुद केलेल्या त्या-त्या पदाकरीता आवश्यक शैक्षणिक **अर्हतेबाबत गुणपत्रिका / प्रमाणपत्राची साक्षांकित** प्रत जोडणे आवश्यक आहे.

**६.२. जन्म तारखे**बाबतचा पुरावा जोडणे आवश्यक आहे. (उदा. शाळा सोडल्याचा दाखला, जन्मनोंदणी प्रमाणपत्र)

६.३. **अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, जातीचा दाखला, नॉन क्रिमिलेअर, महाराष्ट्राचा रहिवासी असलेबाबत प्रमाणपत्र (डोमीसाईल सर्टीफिकेट), अपंग असल्यास अपंग असल्याचे प्राधिकृत अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त असल्यास जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचा दाखला, माजी सैनिकांच्या बाबतीत डिसचार्ज सर्टिफिकेट, अंशकालीन कर्मचाऱ्यांचा बाबतीत सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनें अतंर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याचा रोजगार मार्गदर्शन केंद्र कार्यालयाकडील दाखला, मागासवर्गीयांच्या आरक्षित जागेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र तसेच खुला महिला आरक्षित जागेसाठी अर्ज करणा-या महिलांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती** सोबत जोडणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती. अर्जासोबत जोडलेल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. साक्षांकित प्रती राजपत्रित अधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकारी यांनीच सांक्षाकित केलेल्या असाव्यात, तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती आढळल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारण्यांत येईल.

६.४. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती , भटक्या जमाती, वि.मा.प्र) आणि इ.मा.व यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) मधील कलम ४ (२) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.अ, भ.ज.ब., भ.ज.क., आणि भ.ज.ड, विमाप्र व इमाव या प्रवर्गांना लागू करण्यांत आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक सामाजिक न्याय सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५, दिनांक ३० जून २००६ सोबतच्या सुधारीत नमुन्यात **उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी दिनांक १/४/२०१२ पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. खुला प्रवर्गातील महिला राखीव पदासाठीही नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.** सदर सुधारीत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

६.५. महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. **खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी दिनांक १/४/२०१२ रोजी अथवा तद्नंतर निर्गमित केलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.** असे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

६.६. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय दिनांक ३०/४/२००५ चे सहपत्र परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या मान्यताप्राप्त खेळामधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान **राज्य अजिंक्यपद स्पर्धांत प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा उमेदवार** खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करतांना दिनांक ३०.०४.२००५ व दिनांक १८.११.२००६ चे शासन निर्णयातील निकष विचारात घेतले जातील.

राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविलेल्या उमेदवारास

प्राधान्य देण्यांत येईल.

राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके पात्र केलेली व्यक्ती खेळाडू पदासाठी राखिव असलेल्या पदासाठी अर्ज करु शकते.

**टीप:-** (शालेय क्रिडा स्पर्धांमध्ये, महाविदयालयीन, विदयापीठ स्तरावर, तालुका पातळीवरील व जिल्हा पातळीवरील खेळाडूंची प्रमाणपत्र उमेदवारांचे अर्ज खेळाडू राखीव पदासाठी नाकारण्यांत येतील)

६.७.अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवा योजना कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व तसे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे. .

७. **<u>उमेदवाराचा अर्ज खालील कारणांमुळे नाकारण्यात येईल.</u>**

७.१. अर्जातील मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला असेल तर

७.२. अर्जावर आरक्षण / प्रवर्ग नमुद केलेला नसल्यास

७.३. अर्ज सदोष रितीने भरलेला असल्यास

७.४. अर्जासोबत **परिशिष्ट-ब** मधील रकाना ६ नुसार अर्ज ज्यांच्या नावे करावयाचा आहे त्यांच्या नांवे Payable at Alibag असलेल्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा रेखांकित केलेला विहित रकमेचा डी.डी. नसल्यास.

७.५. अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी नसल्यास

७.६. अर्ज स्विकारण्याची विहित केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झाला असल्यास

७.७. अर्जावर स्वत:चे छायाचित्र चिटकविले नसल्यास

७.८. विहित शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्र, गुणपत्रक जोडलेले नसल्यास

७.९. वयाची अट पुर्ण करीत नसल्यास

७.१०. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर केले नसल्यास

७.११.जन्म तारखेचा पुरावा जोडला नसल्यास

**<u>७.१२.खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जा सोबत सादर न केल्यास अर्ज नाकारण्यात येईल.</u>**

अ) मागासवर्गीय उमेदवाराचे जात प्रमाणपत्र .

ब) महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा (नॉन क्रिमिलिअर)

क) प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवाराने प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त असल्याचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र.

ड) अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडू उमेदवाराचे क्रिडा / खेळ विषयक प्रमाणपत्र

इ) माजी सैनिक असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व डिसचार्जकार्ड

फ) अंशकालीन उमेदवारांनी अंशकालीन प्रमाणपत्र आणि रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबत **सेवायोजन कार्यालयाचे** नोंदणी प्रमाणपत्र

ह) नांवातील बदलाबाबत शासन राजपत्राची अथवा विवाह नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत /शपथपत्र रुपये १०० च्या स्टँम पेपरवर

म) अपंगाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र

८. **<u>परीक्षेचा निकाल</u>**

८.१) परिक्षेचा निकाल यथावकाश रायगड जिल्हा परिषदेच्या व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच जिल्हा परिषदेच्या व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.zpraigad.gov.in व www.raigad.gov.in ) प्रसिद्ध करण्यात येईल.

८.२) गुणवत्ता यादी प्रवर्ग निहाय तसेच समांतर आरक्षणानुसार तयार करण्यांत येईल.

९. **<u>उमेदवाराची निवड झाल्यानंतर अटी व शर्ती</u>**

९.१)महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती, वि.जा.अ , भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३) मधील कलम क्रमांक ३ खालील परंतुकातील तरतुदीनुसार व शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी -२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ ब, दि.१२.१२.२०११ अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर, नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबधीत जात पडताळणी समिती कडुन जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करावे. अन्यथा सदर उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यांत येईल.

९.२)नियुक्त झालेल्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ नुसार लागू करण्यात आलेली अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

९.३)निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व आवश्यकता भासल्यास फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल.

९.४)निवड समितीने तयार केलेल्या निवड सुचीमधून गुणानुक्रमानुसार उमेदवारांच्या नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधीत पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जाती प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधीत उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसूचीतील ज्येष्ठतेनुसार/गुणानुक्रमानुसार किंवा अतिरीक्त निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्येष्ठतेनुसार/गुणानुक्रमानुसार (संबंधीत प्रवर्ग/समांतर आरक्षणातील गुणानुक्रमानुसार/ज्येष्ठतेनुसार) उमेदवाराची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येईल. निवड सुची तयार करताना विचारात घेतलेल्या रिक्त पदांच्या व्यतिरीक्त नंतर रिक्त झालेल्या पदांसाठी निवड सुचीतील उमेदवारांची शिफारस करण्यात येणार नाही.

९.५) अंतिम निवड झालेला उमेदवार रुजू झाल्यानंतर विहीत केलेल्या सर्व सेवा परिक्षा, विभागीय सेवा प्रवेश परिक्षा, सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच उमेदवाराने हिंदी व मराठी परिक्षा तत्संबंधी नियमानुसार पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास सदर हिंदी व मराठी परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

९.६) मुळ शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात येईल.

९.७) निवड झालेल्या उमेदवारांची चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणी केल्याशिवाय नियुक्ती दिली जाणार नाही.

## १०. विशेष सूचना

१०.१) प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक आहे. एकाच अर्जामध्ये एकापेक्षा अधिक पदांचा अथवा आरक्षणाचा उल्लेख केल्यास सदर अर्ज अपात्र करण्यात येईल.

१०.२) उमेदवाराने अर्ज सुवाच्च व वाचनिय अक्षरात भरावा. उमेदवारांनी अर्जातील कोणताही रकाना रिकामा सोडू नये. रकान्यामध्ये दिलेली माहिती चूकीची नाही याची खात्री करावी. अर्जातील माहिती संगणकावर भरली जाणार असल्याने व त्या आधारे अर्ज पात्र व अपात्र ठरविण्यात येणार असल्याने या सूचनेचे पालन करण्यात यावे. अर्जाची पात्रता व अपात्रता उमेदवारांना लेखी स्वरुपात कळविली जाणार नाही. तथापी सदर यादी जिल्हा परिषदेच्या व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.zpraigad.gov.in व www.raigad.gov.in ) प्रसिद्ध करण्यात येईल.

१०.३) फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत मुदतीत या कार्यालयास प्राप्त होतील, केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारत घेतले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

१०.४) उमेदवाराने आपले अर्ज परिशिष्ट-ब मधील स्तंभ क्रमांक ६ मध्ये नमुद केलेल्या संबधित अधिकाऱ्यांच्या नावे करुन **दि. २६/४/२०१३** पर्यंत समक्ष/पोस्टाने परिशिष्ट-ब स्तंभ ६ मधिल संबधित अधिका-याकडे प्राप्त होतील असे पाठवावेत. सोबतच्या नमुन्यातील अर्ज ए-४ साईजच्या पांढऱ्या कोऱ्या कागदावर हस्तलिखीत/टंकलिखीत सादर करता येतील. मात्र खाडाखोड केलेले अर्ज नाकारण्यात येतील. अर्जाच्या पाकीटावर ठळक अक्षरात पदाचा व आरक्षणाचा उल्लेख करावा. सदर अर्ज केवळ समक्ष अथवा पोस्टाने स्विकारण्यात येतील.

१०.५) अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांका नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच या बाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

१०.६) संबंधीत उमेदवाराने विहीत केलेल्या दाखल्यांच्या / प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्या प्रवर्गासाठी अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. या व्यतिरीक्त उमेदवारांनी कोणत्याही प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती अर्जासोबत जोडू नयेत. सदर मुळ प्रती गहाळ झाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.

१०.७) उमेदवाराने अर्जात दिलेला पत्रव्यवहाराचा पत्ता बदलल्यामुळे अथवा दूरध्वनी बंद केल्यामुळे अथवा टपाल विभागाच्या विलंबामुळे परिक्षेची संधी हुकल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.

१०.८) सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांना देखील या जाहीरातीनुसार पात्र असल्यास अर्ज करणे आवश्यक आहे.

१०.९) उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या साक्षांकीत कागदपत्रानुसार लेखी परिक्षेकरीता पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमुद केलेल्या पत्र व्यवहाराच्या पत्त्यावर पोस्टाद्वारे प्रवेश पत्र पाठविण्यात येतील.

१०.१०) सामान्य प्रशासन विभाग,शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१२७/२०००/१२, दिनांक २८.०३.२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एम.आर.व्ही./२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जुलै, २००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुना-अ मधील विहित नमुन्यांतील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदारांनी सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणें बंधनकारक आहे)

१०.११) उमेदवारांना लेखी परिक्षेला तसेच तोंडी मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

१०.१२) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवारास अपात्र ठरविला जाईल.

११. <u>सर्वसाधारण सुचना :-</u>

१. उमेदवाराचे राष्ट्रीयत्व - भारतीय असावे.

२. अर्ज करणारा उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा.

३. **<u>अर्ज करण्याची रित:-</u>** या जाहिरातीमध्ये दिलेल्या विहीत नमुन्यात A-४ आकाराच्या कागदावरच व त्यावर उजव्या बाजूला पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटोवर राजपत्रित अधिकाऱ्याची प्रतिस्वाक्षरी असावी. **अर्ज समक्ष अथवा पोष्टाने दिनांक २६/०४/२०१३ पर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त होणे आवश्यक आहे( कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून). मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.** व उमेदवाराने अर्जासोबत स्वत: चा एक जादा पासपोर्ट साईज फोटो दयावा व फोटोच्या मागील बाजूस आपले संपूर्ण नांव नमुद करावे.

४. शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने सादर करावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

५. **सर्व प्रवर्गातील खेळाडु करीता अर्ज करणा-या उमेदवारांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (Creamy Layer ) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र आवश्यक नाही.**

६. निवडणूक /नैसर्गिक आपत्ती /इतर कारणामुळे विहीत दिवशी लेखी परिक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोईच्या दिवशी परिक्षा घेतली जाईल.

७. उमेदवारांनी आपले अर्ज परिशिष्ट-ब मधील रकाना क्रमांक ०६ नुसार रायगड जिल्हा परिषदेच्या संबंधीत कार्यालयात सादर करावे.

८. शासनाने वेळो वेळी भरती प्रक्रीये संदर्भात निर्गमीत केलेल्या शासन निर्णय/परिपत्रका नुसार सदरची भरती प्रक्रीया राबविण्यांत येईल.

९ लेखी परिक्षेतून आरक्षणानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत जिल्हा निवड समिती सदस्यांच्या उपस्थितीत घेण्यात येईल.

१०. सदरच्या मुलाखतीसाठी उपस्थित राहतांना उमेदवारांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती घेवून उपस्थित राहणे आवश्यक आहे. मुलाखातिचा दिनांक व वेळेचा तपशिल वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. **तसेच मुलाखतीस पात्र उमेदवारांना SMS व्दारे कळविण्यात येईल.**

**सोबत:- अर्जाचा नमुना व लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नमुना**

| | | |
|---|---|---|
| सदस्य सचिव<br>जिल्हा निवड समिती तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)<br>रायगड जिल्हा परिषद, अलिबाग | सदस्य<br>जिल्हा निवड समिती तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>रायगड जिल्हा परिषद, अलिबाग | अध्यक्ष<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हाधिकारी,<br>रायगड-अलिबाग |

# अर्जाचा नमूना

जाहिरात क्रमांक १/जिनिस/रायगड जिल्हा परिषद,अलिबाग/२०१३

पासपोर्ट साईज फोटो लावावा

दिनांक:- / /२०१३

**------- प्रवर्गातील ---------- पदासाठी अर्ज**

| अर्ज नोंदणी क्रमांक :- | परिक्षा क्रमांक. :- |
|---|---|

**प्रति,**

.-------------------------------------------------------------------------

. -------------------------------------------------------------------------

. -------------------------------------------------------------------------

**विषय :-** ------------------------------------------------------------ **पदासाठी अर्ज सन २०१३.**

**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक १/जिनिस/रायगड जिल्हा परिषद,अलिबाग/२०१३, दिनांक / ०४/२०१३

---------------------------------------- पदाकरिता जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

| १. उमेदवाराचे संपूर्ण नांव | स्वत:चे नांव | वडीलांचे / पतीचे नांव | आडनांव |
|---|---|---|---|
| मराठी | --------------------- | -------------------- | --------------------- |
| इंग्रजी | --------------------- | -------------------- | --------------------- |

| २. पत्रव्यवहाराचा पत्ता | --------------------- | -------------------- | --------------------- |
|---|---|---|---|
| | --------------------- | -------------------- | --------------------- |
| | --------------------- | -------------------- | --------------------- |

दुरध्वनी व मोबाईल क्रमांक

| | |
|---|---|
| | |

३. मागासवर्गीय असल्यास जातीचे नांव (जात / पोटजात/प्रवर्ग) --------------------------

४. जातीचे वैधता प्रमाणपत्र आहे काय होय / नाही

५. खालील नमुद केलेल्या प्रवर्गापैकी लागू असलेल्या चौकटीमध्ये (√ ) खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

समांतर आरक्षण लागू असल्यास चौकटीमध्ये ( √ ) खुण करावी.

| माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | अपंग | अंशकालिन कर्मचारी | खेळाडू |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

६. उमेदवार क्रिमिलेअर आहे की नॉन क्रिमिलेअर ? :- ------------------

७. उमेदवार प्रकल्पग्रस्त आहे की भूकंपग्रस्त आहे ? :- ------------------

८. अंशकालिन कर्मचारी असल्यास रोजगार मार्गदर्शन केंद्र कार्यालयाकडील दाखला जोडला आहे का ? :- ------------------

९. उमेदवार अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार / प्रवर्ग नमूद करुन किमान ४०% अपंगत्वाचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र

| | |
|---|---|
| अ. अशंत:अंध | |
| ब. अशंत:कर्णबधीर | |
| क. अस्थिव्यंग | |
| किती टक्के अपंग आहे. | % |

( सूचना :- होय / नाही चौकटीत नमुद करणे )

१०. अर्जदार माजी सैनिक आहे काय ? :- ☐

११. अर्जदार लष्करी कारवाईत मृत्यू पावलेल्या कुटुंबीयांपैकी आहे काय ? :- ☐

१२. अर्जदार वीरपत्नी / परितक्त्या महिला / तरुण विधवा यापैकी आहे काय ? ( असल्यास नमुद करावे ------------------------------------------------------ ) :- ☐
वीरपत्नी :- सैन्यात असताना मृत्यू पावलेल्या सैनिकाची विधवा पत्नी किंवा सैन्यांत असताना अपंग झालेल्या सैनिकाची पत्नी )

१३. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचेकडे नांव नोंदविले असल्यास :- कार्यालयाचे नांव:- ------------------------------------------------

नोंदणी क्रमांक- ------------------------------------------------

१४. महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहात काय?:- ----------------------------------

१५. जन्म तारीख तारीख : -------------------------- महिना : -------------------------- वर्ष : --------------------------

१६. वय - अर्ज स्विकारणेच्या अंतिम तारखेस (दि. ---/०४/२०१३) वर्षे : --------------- महिने : ------------------- दिवस : --------------------

१७. **जन्मठिकाण -** गांव/शहर : ------------------- तालुका : --------------------- जिल्हा : ---------------------- राज्य : ----------------------

१८. **शालांत किंवा तत्सम परिक्षेपासून उत्तीर्ण झालेल्या सर्व परिक्षांचा तपशिल:-**

| परिक्षेचे नांव | शाळेचे / विदयापीठाचे नांव / संस्थेचे नांव | विषय / परिक्षेत मिळालेले एकूण गुण (टक्केवारी) | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|
| एस.एस.सी उत्तीर्ण | | | |
| एच.एस.सी.उत्तीर्ण | | | |
| पदवी | | | |
| महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ मुंबई कडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण | | | |

१९) **पूर्वानुभव असल्यास :-**

| कार्यालयाचे / विभागाचे नांव व पत्ता | काम केलेल्या पदाचे नांव | सेवेचा कालावधी | | एकूण कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | वर्ष | महिने |
| | | | | | |

२०. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्र / समाजकल्याण कार्यालय / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांजकडे नांव नोंदणी केली आहे काय? :- [ ]

२१. नांव नोंदणी केली असल्यास नोंदणीचे कार्यालय व नोंदणी क्रमांक — कार्यालयाचे नांव:- ----------------------------------------------

नोंदणी क्रमांक- ----------------------------------------------

२२. राष्ट्रीयत्व — भारतीय / अभारतीय.

२३. डि. डी. क्रमांक : ------------------------------------------- रक्कम : --------------------------------------------- दिनांक : ----------------------------------

## अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत:- डी.डी. व सांक्षाकित केलेले कागदपत्रे.

आपला / आपली विश्वासू

अर्जदाराची सही/-

(अर्जदाराचे नांव)

## लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन

## नमुना-अ

### महाराष्ट्र नागरी सेवा मर्यादित (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन), नियम २००५ नुसार.

मी. श्री. / श्रीम. ---------------------------------------- श्री. --------------------- यांचा मुलगा/ यांची मुलगी/ यांची पत्नी, वय-------- वर्ष, राहणार--------------- ता.----------- जि.----------------- असे जाहिर करतो / करते की,

१. मी ---------------------- पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ---------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी, दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे --------------------- **पदासाठी मी अनर्ह / अपात्र ठरविण्यांस पात्र होईल,** याची मला जाणीव आहे.

दिनांक:-

ठिकाण:- अर्जदाराची नावासहीत सही